अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०७ /२०२६ दि. १९/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि.१४/०९/२०२६ ते दि.२५/०९/२०२६ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. त्याअनुषंगाने **दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी)** गणपती विसर्जन **होणार आहे.** या कालावधीत गणपती विसर्जन व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) अंबरनाथ शहरातुन बदलापुर पश्चिम येथील टी पॉईंट सिग्नल पासुन डावीकडे वळण घेवुन वालीवली एरंजाड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टी पॉईंट सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने कल्याण – अंबरनाथ रोडने येवुन जांभुळ फाटा येथे डावीकडे वळण घेवुन सर्वोदयनगर मार्गे वालीवली एरंजाड रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) बदलापुर पश्चिम येथील टी पॉईंट सिग्नल पासुन उजवीकडे वळण घेवुन वालीवली एरंजाड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टी पॉईंट सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने बदलापुर कल्याण रोडने येवुन जांभुळ फाटा येथे उजवीकडे वळण घेवुन सर्वोदयनगर मार्गे वालीवली एरंजाड रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) एरंजाड वालीवली कडुन बदलापुरकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शिवमंदीर लोटस तलावाचे अलीकडे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने एरंजाड वालीवली रोडने येवुन उजवीकडे वळण घेवुन सर्वोदयनगर मार्गे – जांभुळ फाटा येथुन इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि. २५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी) गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी सायंकाळी १६:०० वा. पासुन गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, **ठाणे शहर**

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.